Bachelor of Commerce (B.Comm) (Part-I) / Bachelor of Science (B.Sc.) / B.Sc. (Information Technology) / Bachelor of Computer Application Second Semester (Old)

# 0229 / 2S-1004 / 2BIT23 / 2BCA2M - Compulsory Marathi (आवश्यक मराठी)

P. Pages : 2 **GUG/W/18/871S**

Time : Three Hours Max. Marks : 80

---

1. 'मराठी माणूस उद्योगधंद्यात मागे कां? या पाठातून व्यक्त झालेले डॉ. बी. जी. शिर्के यांचे व्यावसायिक कर्तृत्व व नेतृत्व स्पष्ट करा. **16**

**किंवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व आर्थिक लोकशाही विषयक विचारांचा आढावा घ्या.

2. 'दे वरचि असा दे!' या कवितेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा मानवतावादी दृष्टिकोण स्पष्ट करा. **16**

**किंवा**

'तयास मानव म्हणावे का? असे सावित्रीबाई फुले का विचारतात?

3. पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. **16**

गट - 'अ'

क) जागतिकीकरणामुळे सगळ्याच गोष्टींचे बाजारीकरण होऊ लागले, असे लेखक कां म्हणतात?

ख) 'उनाथाच्या घाती मोहाला आला बारं'---- या स्त्रीगीतातील' मोह' या शब्दातील श्लेष स्पष्ट करा.

ग) 'दंडार' या लोककलेच्या विकासासाठी लेखकाने कोणते उपाय सुचविले आहेत?

घ) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात लेखकाला कोणता अनुभव आला?

**किंवा**

गट - 'ब'

च) जागतिकीकरणाची प्रक्रिया आपण थांबवू शकत नाही, असे निशिकांत मिरजकर कां म्हणतात?

छ) 'निरक्षरांची अक्षरलेणी' या पाठातील कोणत्याही एका स्त्रीगीताची वैशिष्ट्ये सांगा.

ज) 'दंडार' या लोककलेच्या अधोगतीची कारणे स्पष्ट करा.

झ) पहिल्यांदा वाघ पाहिला तेव्हा लेखकाच्या मनाची अवस्था कशी झाली?

4. पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दांत लिहा. 16

गट -'क'

त) 'उषःकाल होता होता काळरात्र झाली' असे सुरेश भट कां म्हणतात.

थ) 'पऱ्हाटी' या कवितेतून कृषी जीवनाचे दर्शन कवीने कसे घडविले आहे?

द) 'माय' घरी परत येण्यापूर्वीची मुलांची अवस्था कवीने कशी वर्णिली आहे?

ध) उषाकिरण आत्राम यांनी आदिवासींच्या पुरातन संस्कृतीचे वर्णन कसे केले आहे?

**किंवा**

गट - 'ड'

प) 'उभा देश झाला आता एक बंदिशाला' असे सुरेश भट कां म्हणतात?

फ) 'परकरातील पऱ्हाटी, जशी लुगड्यात आली' या ओळीतून कवी काय सूचित करतात?

ब) कवी निंबाळकरांची माय कशामूळे मरण पावली?

भ) सैरभैर आदिवासी तरुणी येणाऱ्या जाणाऱ्याला कोणते प्रश्न विचारते?

5. पुढील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. 16

1) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने साहित्याच्या संदर्भात कोणती स्वागतार्ह परिवर्तने घडवून आणली?

2) ग्रामीण लोकजीवनात दोन बायकांचा दादला उपहासाचा विषय कां बनला?

3) 'कसे पुण्य दुर्दैवी अन् पाप भाग्यशाली' - असे कवी कां म्हणतात?

4) 'माय'च्या पायातून भळाभळा रक्त कां वाहत होते?

**********



munotes.in